# प्रेसनोट

## १५ ऑगस्ट स्वतंत्रता दिवस साजरा करण्यात आला.

जा.क्र. ५७४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०८/२०१७

भंडारा :– येथील पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर दि. १५/०८/२०१७ रोजी १५ ऑगस्ट स्वतंत्र दिवस साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे मा. जिल्हाधिकारी भंडारा श्री. सुहास दिवसे तसेच मा. पोलीस अधिक्षक भंडारा विनिता साहु, अपर पोलीस अधीक्षक रश्मि नांदेडकर हे उपस्थित होते. भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या ७० व्या वर्धापनदिनानिमीत्त पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर मा. जिल्हाधिकारी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

त्यानंतर मा. जिल्हाधिकारी यांनी परेडचे निरीक्षण केले. यावेळी भंडारा जिल्हा पोलीस दल, भंडारा गृहरक्षक दल, एन. सी. पथक, दामीणी पथक, पोलीस श्वान पथक मिळुन अशा १२ पथंकाचा समावेश होता. तसेच पोलीस विभागाच्या वतीने जनजागृती चित्ररथ, १०८ आपातकालीन रुग्णवाहीका, यावेळी परेड कमांडर श्रीकांत अवदुंबर दिसले उपविभागीय अधीकारी साकोली, हे होते. तसेच दुय्यम परेड कमांडर शंशीकांत गणेशलाल वर्मा राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय भंडारा हे करीत होते.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुने मा. जिल्हाधीकारी भंडारा यांनी आपल्या भाषणामध्ये पत्रकार, माजी सैनीक, शिक्षक, कर्मचारी वर्ग, लोकप्रतिनीधी, विद्यार्थी तसेच समस्त भंडारा वाशीयांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. देशाच्या स्वातंत्र्य सोहळा साजरा करतांना मला अतिशय आंनद होत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळुन देण्यासाठी ज्या शुर स्वातंत्र्य सैनिकांनी सर्वस्वाचा त्याग केला देशासाठी बलीदान केले त्यांचे अभिवादन करतो. शेतीविकास शेतकरी हा शासनाचा केन्द्र बिंदु असुन कर्जात असलेल्या शेतकऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज कृषी ४७ हजार ३११ कोटी शेतकऱ्यांना कर्जमाफीचा याचा लाभ होणार आहे. पंतप्रधान पिक योजनेअंतर्गत एकही लाभार्थी वंचीत राहणार नाही. शेतकरी सुपिकतेबाबत उत्पादनात वाढ व्हावी. यासाठी शासनाने गायमुक्त दरात गावमुक्त शिवार बॅक सुरु केली आहे. या अभियानात भंडारा जिल्हयामध्ये अत्यंत समाधानाचे स्थान झाले असुन संपुर्ण लोक सहभागातुन जिल्हातील ५२ तलावाचे ४५ हजाराचे घनमिटर गाळ काढण्यात आले. हा गाळ ५७० हेक्टर गाळ जलयुक्त तलावात वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे पाणी पातळीत वाढ झाली. जमीनीचा पोत सुधारण्यास मदत झाली आहे. दृष्काळमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी शासनाने महत्काक्षा जलयुक्त शिवार राबविण्याचे निर्णय घेतला आहे. या अभियानाअर्तगत ८६ गावाची निवड झाली आहे. तसेच विद्यार्थ्यांना पाठयपुस्तकाचे पाटप करण्यात आले.

जिल्हा प्रशासनामार्फत विवीध योजना भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालय यांनी १५९ टक्के उदिष्ट पुर्ण करुन कायाकल्प योजनेत उपजिल्हा रुग्नालय तुमसरला १लाख रुपयाचा पुरस्कार मिळाला त्याबाबत अभिनंदन केले. रोजगार हमी योजनेत वेळेवर मंजुर हजर करण्यास भंडारा जिल्हा अव्वल ठरला आहे. राष्ट्रीय जननी सुरक्षा योजना शहरी व ग्रामीण भागात राबविण्यात येत आहे.

त्यानंतर भंडारा जिल्हा पोलीस दलातर्फे परेड, कवायत मैदानाच्या प्रांगणात सभोवताल मिरविण्यात आले. यावेळी कार्यक्रमामध्ये पोलीस पुरुष प्लॉटुन व महीलांचा समावेश होता. यावेळी भंडारा जिल्हा पोलीस बॅन्ड पथकाने उत्कृष्ट वादयवृंद सादर केले. कार्यक्रमाच्या शेवटी पारितोषिके वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. उत्कुष्ट कामगिरी करणा–यांना प्रमाणपत्र देवून गौरान्वीत करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाला मा. जिल्हाधिकारी भंडारा श्री. सुहास दिवसे, मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहु, अपर पोलीस अधीक्षक रश्मि नांदेडकर, पोलीस उपअधिक्षक (गृह) कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारा, जिल्हा माहीती अधिकारी भंडारा, उपविभागिय पोलीस अधिकारी श्री. जोगदंळ भंडारा, राखीव पोलीस निरीक्षक (पो. मु.) श्री. वर्मा, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. तसेच भंडारा पोलीस दलातील विविध शाखेचे/पोस्टेचे पोलीस अधिकारी/कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी, ईलेक्ट्रॉक मिडीया, पत्रकार बंधु, व मोठया प्रमाणात विविध क्षेत्रातील जनसमुह उपतस्थित होता. कार्यक्राचे सुत्रसंचालन श्रीमती स्मिता गालफाडे व मुंकुद ठवकर यांनी केले.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करिता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.